# प्रकरण ५ वे

## दैनिक ॲग्रोवनमध्ये दूध व्यवसायाला दिलेले स्थान

५.१ दूध व्यवसायाचे महत्व

५.२ दूध महापूर योजना किंव ऑपरेशन फ्लड योजना (धवलक्रांती):-

५.३ २००७ वार्षिक दूध विषयक बातम्यांचा संख्यात्मक तक्ता व विश्लेषण-

५.४ दूधविषयक बातम्यांचे वार्षिक संकलन तक्ता व विश्लेषण

# प्रकरण ५ वे

## '' दैनिक ॲग्रोवन मधील दुधव्यवसायाचे स्थान ''

## (जाने.२००७ ते डिसें.२००७)

### ५.१ दूध व्यवसायाचे महत्व -

भारत हा शेतीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. वाढत्या लोकसंख्येची अन्नाची गरज, पशुसंवर्धनासाठी आवश्यक असलेले पशुखाद्य आणि उद्योगासाठी लागणारा कच्चा माल हा शेती व्यवसायातून पुरविला जातो. भारताचा आर्थिक कणा म्हणून शेतीला संबोधले जाते, परंतु शेतीबरोबर शेतीला पूरक व्यवसायही समाविष्ठ झाले आहेत. कुक्कूटपालन, दुग्ध-व्यवसाय, मस्यशेती, मेंढीपालन असे शेतीला जोडधंदे करुन शेतकरी अधिक उत्पन्न वाढवत आहेत. दुष्काळ, कर्ज, सावकारी पाश, शेतमालाचे घसरणारे दर एकरी उत्पादन क्षमता कमी, शेतीचे क्षेत्र लहान यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान होत आहे. नुकसान भरुन काढण्यासाठी आणि आर्थिक उत्पन्न वाढविण्यासाठी प्रत्येक शेतकरी जोडधंदा करत आहे. जोडधंद्यामध्ये अधिक शेतकरी दूधव्यवसाय करत आहेत. दूधव्यवसायामुळे प्रत्येक शेतकरी सधन बनत चालला आहे.

शेतकऱ्याच्या आयुष्यात दूधव्यवसायाला अनन्यसाधारण महत्व आहे. शेतकरी सभासद दरवर्षी जेवढे अधिक उत्पादन करतील तेवढा अधिकचा परतावा त्यांना मिळतो. कोणत्याही अनुदानाशिवाय हे घडत आले आहे. दूध नावाच्या पदार्थाचे शेतकरी कुटुंब संकलन करते. त्याची विक्री करते आणि त्यातून पुरेसा नफा कमावते. अमूल आणि एन.डी.डी.बी. च्या प्रेरणेतून निर्माण झालेली दूग्धविकास सहकारी चळवळ ही भारतातील सर्वात मोठी रोजगार योजना आहे. योजनेमुळे शेतकरी कुटुंबाचे उत्पन्न दुपटीहून अधिक झालेले आहे. शेतकरी पत्नीला दूधातून मिळणारे उत्पन्न तिच्या नवऱ्याच्या शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या बरोबरीच होऊ लागलं. दूध उत्पादनात देशाला स्वयंपूर्णता आली ती

'दूध महापूर' (ऑपरेशन फ्लड) योजनेमुळे आणि त्यातला सहकारी संरचनेमुळे हेतू साध्य झाला. आज देशातल्या १.१ कोटी शेतकऱ्यांच्या मालकीचे २०० डेअरी प्लँट आहेत. यातून २५.८ कोटी लिटर प्रतिदिन दूधाचा वापर केला जातो. याचे सारे श्रेय डॉ. वर्गीस कुरियन यांना जाते. त्यांच्या प्रेरणेने देशात धवल क्रांती घडली. परंतु आज सहकारीची ढासळत चाललेली अवस्था यामुळे उत्पादकाबरोबर ग्राहकालाही चटके बसू लागले आहेत. दूध व्यवसायाची कालची स्थिती-आजची स्थिती आणि उद्याची स्थिती यात मोठी तफावत आहे.

दूध व्यवसायाचं जाळं झपाट्यानं पसरण्यासाठी माध्यमांची बहुमोलाची मदत आहे. आजचा शेतकरी सज्ञान बनला आहे. मेळावे, बचतगट, व्याख्याने, प्रशिक्षण याबरोबर प्रसारमाध्यमांची मदत होत आहे. प्रसारमाध्यमांनी ग्रामीण भागातील अधिक वाचक शेतकरी असल्याने कृषी पत्रकारितेचा विकास केला. कृषी पत्रकारितेचा मुख्य उद्देश शेती व शेतकऱ्यांचा आर्थिक विकास आणि व्यवसायाभिमुख प्रबोधन करणे हा आहे.

## ५.२ दूध महापूर योजना किंव ऑपरेशन फ्लड योजना (धवलक्रांती):-

डॉ. वर्गिस कुरियन यांच्या प्रयत्नाने देशात धवल क्रांती घडून आली. १९७० साली डॉ. कुरियन व तत्कालिन पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी संसदेमध्ये ठराव मंजूर करुन अन्नप्रकल्प ६१८ (फुल प्रोजेक्ट) ही भारताला योजना दिली. या योजनेचे नाव 'ऑपरेशन फ्लड' किंवा व्हाईट रेव्ह्युलेशन असे सुचवले. या योजनेमागे प्रमुख दोन कारणे होती. ती म्हणजे, भारतातील महिलांना दूध व्यवसायाच्या माध्यमातून घरातून बाहेर पडण्याची संधी मिळावी. या माध्यमातून पैशाचे मोल व व्यवहार कळेल आणि व्यक्तिमत्वाचा विकास घडविण्याचे आत्मज्ञान येईल. दुसरे कारण म्हणजे भारतात हेल्थ ऑर्गनायझेशनच्या म्हणण्यानुसार दर माणसी २८० ग्रॅम दूध लागते. परंतु भारतात दर माणशी १०५ ग्रॅम दूध उपलब्ध होत होते. हा तुटवडा भरुन काढणे ही कारणे होती.

ही योजना गुजरात राज्यातील खेडा जिल्ह्यात आनंद गावामध्ये 'अमूल' या सहकारी दूध संस्थेमार्फत राबविली गेली. या योजनेमध्ये मुंबई, दिल्ली, कलकत्ता, मद्रास व बेंगलोर अशा महानगरांना दूध पुरवठा अपुरा होता, या शहरांची दुधाची गरज भागवून

मिळणाऱ्या पैशातून (Fund Jonration) ग्रामीण भागातील गावात दूध संस्था स्थापन करणे आणि जनावरांचे संगोपन करुन जिल्हा स्तरावरील दूध संस्थांमार्फत दूध संकलन करुन ते मोठ्या शहरांना पुरवणे ही होती. NDDB (National dairy development Board) आणि IDC (Indian dairy corporation) यांच्या सहकार्याने ही योजना तीन टप्प्यात राबविली. पहिली योजना १९७० -१९८५, दुसरी योजना १९८५- १९९०, तिसरी १९९०-१९९५ मध्ये राबविली गेली.

आता २००७-०८ मध्ये १०४ कोटी मे. टना पर्यंत दूध उत्पादन होऊन भारत आजही जगात दूध उत्पादन करणारा नंबर एक देश आहे. हे सर्व खरे असले तरी प्रतिजनावर भारतातील दूध उत्पादन कमी आहे. हे दूध उत्पादन वाढविण्यासाठी पशुसुधारण मॅनेजमेंट या तत्वाचा वापर करुन चांगल्या जनावरांची पैदास व त्यातून दूध उत्पादन वाढविणे ही आपल्या देशापुढील गरज आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.


## २००७ वार्षिक दूधविषयक बातम्यांचा संख्यात्मक व आकारमानाचा तक्ता

| अ.क्र. | महिना | संख्यात्मक | कॉलम सेमी | एकूण संख्यात्मक | एकूण कॉलम सेमी | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **जानेवारी** | - | - | १ | ८६७ | १.७८ |
| | ता.४ | - | - | | | |
| | ता.११ | - | - | | | |
| | ता.१८ | १ | ८६७ | | | |
| | ता.२५ | - | - | | | |
| २ | **फेब्रूवारी** | | | २ | २९४ | ०.६० |
| | ता.१ | - | - | | | |
| | ता.८ | - | - | | | |
| | ता.१५ | २ | २९४ | | | |
| | ता.२२ | - | - | | | |
| ३ | **मार्च** | - | - | १ | ७८.५ | ०.१२ |
| | ता.१ | - | - | | | |
| | ता.८ | - | - | | | |
| | ता.१५ | - | - | | | |
| | ता.२२ | १ | ७८.५ | | | |
| ४ | **एप्रिल** | | | १ | ६० | ०.१२ |
| | ता.५ | - | - | | | |
| | ता.१२ | - | - | | | |
| | ता.१९ | - | - | | | |
| | ता.२६ | १ | ६० | | | |

| अ.क्र. | महिना | संख्यात्मक | कॉलम सेमी | एकूण संख्यात्मक | एकूण कॉलम सेमी | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | **मे** | | | ४ | ९६३.३२ | १.९८ |
| | ता.३ | १ | २३२ | | | |
| | ता.१० | २ | ५५१ | | | |
| | ता.१७ | १ | १८०.३२ | | | |
| | ता.२४ | - | - | | | |
| ६ | **जून** | | | ४ | ५३६.५० | १.१० |
| | ता.७ | - | - | | | |
| | ता.१३ | - | - | | | |
| | ता.२१ | - | - | | | |
| | ता.२८ | ४ | ५३६.५ | | | |
| ७ | **जुलै** | | | १ | ४१.३६ | ०.०८ |
| | ता.५ | - | - | | | |
| | ता.१२ | १ | ४१.३६ | | | |
| | ता.१९ | - | - | | | |
| | ता.२६ | - | - | | | |
| ८ | **ऑगस्ट** | | | ०४ | ११००.४१ | ०.४४ |
| | ता.२ | १ | ८६७ | | | |
| | ता.९ | १ | ३१.९६ | | | |
| | ता.१६ | १ | ५१ | | | |
| | ता.२३ | १ | १५०.४५ | | | |

| अ.क्र. | महिना | संख्यात्मक | कॉलम सेमी | एकूण संख्यात्मक | एकूण कॉलम सेमी | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | **सप्टेंबर** | | | - | - | - |
| | ता.६ | - | - | | | |
| | ता.१३ | - | - | | | |
| | ता.२० | - | - | | | |
| | ता.२७ | - | - | | | |
| १० | **ऑक्टोबर** | | | ०२ | ५३९.७५ | १.११ |
| | ता.४ | - | - | | | |
| | ता.११ | १ | ३२३ | | | |
| | ता.१८ | - | - | | | |
| | ता.२५ | १ | २१६.७५ | | | |
| ११ | **नोव्हेंबर** | | | ०३ | ७४४ | १.५३ |
| | ता.१ | २ | ६२० | | | |
| | ता.८ | १ | १६४ | | | |
| | ता.१५ | - | - | | | |
| | ता.२२ | - | - | | | |
| १२ | **डिसेंबर** | | | ०१ | ४५९ | ०.९४ |
| | ता.६ | १ | ४५९ | | | |
| | ता.१३ | - | - | | | |
| | ता.२० | - | - | | | |
| | ता.२७ | - | - | | | |

२००७ वार्षिक दूधविषयक बातम्यांचा स्तंभालेख



## ५.३ २००७ वार्षिक दूध विषयक बातम्यांचा तक्ता विश्लेषण-

२००७ या वर्षात दैनिक ॲग्रोवन मध्ये प्रसिध्द झालेल्या विविध बातमी प्रकारांपैकी दूध विषयक बातम्यांचा संख्यात्मक व आकारात्मक स्वतंत्र अभ्यास या प्रकरणात करण्यात आला आहे. अभ्यासलेल्या अंकांमध्ये एकूण १५४४ इतक्या बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. मात्र संख्यात्मक दृष्ट्या विचार करता केवळ (२४) बातम्या या दूध विषयक आहेत. सप्टेंबर महिन्याच्या अभ्यासलेल्य अंकामध्ये असे दिसून येते की, दूध विषयक बातम्या प्रकाशित झालेल्या नाहीत. एकूण बातम्यांचा विचार करता २४ पैकी ४ बातम्या ह्या मे व ऑगस्ट महिन्यात देण्यात आल्या आहेत. ही संख्या सर्वात जास्त आहे. तर जानेवारी, मार्च, एप्रिल, जुलै, डिसेंबर या महिन्यांमध्ये सर्वात कमी म्हणजे प्रत्येकी १ दूध विषयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.

प्रत्येक महिन्याच्या अभ्यासलेल्या अंकांचा विचार करता (५६८४.११सेमी) इतकी जागा ही दूधविषयक बातमी प्रकाराला देण्यात आली आहे. यात ऑगस्ट महिन्यात सर्वाधिक म्हणजे (११००.४१सेमी) एवढ्या आकारमानात बातम्या प्रकाशित झाल्या आहेत, तर जुलै महिन्यात सर्वात कमी म्हणजे (४१.३६ सेमी) इतक्या कमी जागेत बातम्या प्रकाशित झाल्या आहेत.

एकूण बातम्यांच्या टक्केवारीचा विचार करता जुलै महिन्यात सर्वात कमी (०.०८ %) इतक्या दूधविषयक बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. मे महिन्यामध्ये (१.९८%) अशी सर्वात जास्त टक्केवारी दूध विषयक बातम्यांची आहे.

| अनु-क्रमांक | महिना | तारीख | पान नं. | बातमीचा मथळा | बातमीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | जानेवारी | १८ | ११ | संकरित गायींना मागणी | उद्योगधंदे |
| २ | फेब्रूवारी | १५ | १ | दूधभूकटी निर्याती बंदीमुळे शेतकरी-उत्पादक संकटात | आयात-निर्यात |
| | फेब्रूवारी | १५ | ३ | (पान १ वरुन) दूधभुकटी निर्यातीबंदीमुळे शेतकरी- उत्पादक संकटात | आयात-निर्यात |
| ३ | मार्च | २२ | ४ | दुग्धजन्य पदार्थ निर्मितीच्या प्रशिक्षण वर्गास प्रतिसाद | कार्यशाळा |
| ४ | एप्रिल | २६ | ११ | दूधसागर डेअरीच्या दूधाची संरक्षण खात्याकडून मागणी | आयात-निर्यात |
| ५ | मे | ३ | ३ | शेतकऱ्यांनी दूध जिल्हा दूध संघातच घालावे... बाळासाहेब नेवाळे | मुलाखत |
| | मे | १० | ९ | बागायतदार होण्याचे स्वप्न दूधव्यवसायामुळे साकार | यशकथा |
| | मे | १० | १६ | राज्यातील दूध व्यवसायावर विदर्भाची साय | अनुदान |
| | मे | १७ | ७ | खाजगी दूधउद्योग सहकारी उद्योगांना मागे टाकणार? | माहितीपर बातमी |
| ६ | जून | २८ | १ | दूधबंद आंदोलनाचा संकलनावर परिणाम | आंदोलन |
| | जून | २८ | २ | दूधाची दरवाढ हवी पण. . . . | वाचकांचा पत्रव्यवहार |
| | जून | २८ | ४ | (पान १ वरुन) दूध बंद आंदोलनाचा संकलनावर परिणाम | आंदोलन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | जून | २८ | ५ | नगर जिल्ह्यात दूध बंद आंदोलनास अत्यल्प प्रतिसाद | आंदोलन |
| ७ | जुलै | १२ | १ | दूधदरवाढ व भेसळीबाबत बैठक निष्फळ | राजकीय |
| ८ | ऑगस्ट | २ | ११ | दहा जनावरांचा गोठा फायद्याचा | माहितीपर बातमी |
| | ऑगस्ट | ९ | ४ | दूधभेसळीचा गुन्हा अजामीनपात्र होणार | कायदेविषयक |
| | ऑगस्ट | १६ | १४ | दहा लि. दूध देणाऱ्या गायीला चारा व खुराक कधी व कसा द्यावा? | वाचकांचे प्रश्न |
| | ऑगस्ट | २३ | १ | पॅकेजपूर्व आढावा बैठकीत वरिष्ठ अधिकारी फैलावर | राजकीय |
| ९ | सप्टेंबर | - | - | - | - |
| १० | ऑक्टोबर | ११ | २ | दूध उत्पादनवाढीसाठी द्विदल चारा | माहितीपर लेख |
| | ऑक्टोबर | २५ | ५ | दूधदराच्या कपातीचा उत्पादकांना फटका | दरकपात |
| ११ | नोव्हेंबर | १ | १ | दूधदरात अखेर वाढ | दरवाढ |
| | नोव्हेंबर | १ | ११ | आधुनिक पध्दतीचा गोठा बांधणीची पध्दती | वाचकांचे प्रश्न |
| | नोव्हेंबर | ८ | ५ | 'गोकुळ श्री' स्पर्धेत जाफराबादी म्हैस व गंगा गाय प्रथम | स्पर्धात्मक |
| १२ | डिसेंबर | ६ | ७ | गायीचे दूध , मूत्र यांच्या वापरास महत्व- शास्त्रज्ञ | नवे संशोधन |

## तक्ता क्र. २ चे विश्लेषण

**जानेवारी -**

या महिन्याच्या ४,११,१८ व २५ या तारखांच्या अभ्यासलेल्या अंकामध्ये असे दिसले की, केवळ १८ तारखेच्या अंकात पान क्र. ११ वर दूधविषयक बातमी दिली आहे. याचा मथळा 'संकरित गायींना मागणी' असा आहे. हा माहितीपर लेख असून यामध्ये संकरित गायींचे व्यवस्थापन, तपासणी दूध वाढीसाठी आवश्यक जनावरांची पैदास याविषयी माहिती दिली आहे.

**फेब्रूवारी -**

या महिन्याच्या १५ तारखेच्या अंकामध्ये पहिल्या पानावर दूधविषयी बातमीला स्थान मिळाले आहे. यात दूधभुकटी निर्यातीबंदीमूळे शेतकरी उत्पादक संकटात अशा मथळ्याखाली बातमी दिली आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे पुन्हा बाजारपेठ मिळवणे अवघड होईल तसेच उर्जितावस्थेत असलेला दूध व्यवसाय धोक्यात येईल. असे मत व्यक्त केले आहे.

**मार्च -**

या महिन्याच्या अभ्यासलेल्या २२ तारखेच्या अंकामध्ये पान ४ वर 'दूग्धजन्य पदार्थ निर्मितीच्या प्रशिक्षण वर्गास प्रतिसाद' असा बातमीचा मथळा आहे. यामध्ये महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी दुग्धजन्य पदार्थ निर्मितीचे प्रशिक्षण त्यांना मिळणे गरजेचे आहे. यासाठी पुणे येथील महिला बचत गटांना दिलेल्या प्रशिक्षण वर्गाला मिळालेल्या प्रतिसादाची ही बातमी आहे.

**एप्रिल -**

या महिन्याच्या २६ तारखेला पान ११ वर 'दूधसागर डेअरीच्या दूधाची संरक्षण

खात्याकडून मागणी' या मथळ्याची बातमी प्रकाशित झाली आहे. संरक्षण खात्याकडून गुजरातमधील दूधसागर डेअरीच्या नव्या गोड दूधाच्या उत्पादनासाठी नोंद केलेल्या मागणी संबंधी ही बातमी आहे.

**मे -**

या महिन्यात अभ्यासलेल्या अंकांपैकी ३,१० व १७ तारखेच्या अंकात या बातम्या आहेत. ३ तारखेच्या अंकात पान ३ वर पूणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब नेवाळे यांची मुलाखत दिली आहे. १० तारखेला पान ९ वर पोहेगांव येथील उच्चशिक्षित असूनही दूध उत्पादनाकडे वळलेल्या सचिन पाचोरे यांची यशकथा दिली आहे. या अंकाच्या शेवटच्या पानावर 'राज्यातील दुग्धव्यवसायावर विदर्भाची साय' या मथळ्याची बातमी आहे. कडक उन्हाळ्यामुळे विदर्भात दूधव्यवसायात मंदी आली त्यातून सावरण्यासाठी शेतकऱ्यांना मिळालेल्या अनुदानाची माहिती आहे. १७ तारखेच्या अंकात पान ७ वर येत्या २०११ पर्यंत खाजगी दूध डेअरी उद्योग हा सहकारी उद्योगांना ओलांडून पुढे जाईल असा अंदाज 'डेअरी इंडियाने' व्यक्त केला आहे.

**जून -**

पाहिलेल्या ४ अंकांपैकी २८ तारखेच्या अंकात दूध दरवाढ व त्यासाठी केलेल्या आंदोलनाच्या ४ बातम्या आहेत, त्यापैकी 'दूधाची दरवाढ हवी पण.... ' हा वाचकांचा पत्रव्यवहार आहे.

**जुलै -**

या महिन्यात १२ तारखेच्या अंकात पान १ वर त्याची दरवाढ आणि भेसळ नियंत्रणासाठी शासनाने बोलावलेल्या राज्यातील सर्व दूध उत्पादक संघाच्या बैठकीची बातमी आहे. ती अँकर न्यूज आहे.

**ऑगस्ट-**

या महिन्यात अभ्यासलेल्या प्रत्येक अंकामध्ये दूधव्यवसायाची प्रत्येकी एक बातमी आहे. २ तारखेला पान क्र. ११ वर 'दहा जनावरांचा गोठा फायद्याचा' अशी पूर्ण पान बातमी आहे. कृषी महाविद्यालय पुणे येथील महेंद्र मोटे यांनी आदर्श गोठा कसा असावा याचे मार्गदर्शन केले आहे.

९ तारखेच्या अंकात पान क्र. ४ वर पालक मंत्री अजित पवार यांनी दूधभेसळीचा गुन्हा अजामिनपात्र करण्याचा शासनाची भूमिका आहे. हे सांगितले. १६ तारखेच्या अंकात पान १४ वर वाचकांनी विचारलेल्या '१० लिटर दूध देणाऱ्या गायीचे संगोपन कसे करावे?' या प्रश्नाला उत्तर दिले आहे. २३ तारखेच्या अंकात पान १ वर 'पॅकेज पूर्व आढावा बैठकीत वरिष्ठ अधिकारी फैलावर' ही बातमी प्रसिध्द झाली. यामध्ये विदर्भातील दूध उत्पादन विकासासाठी उपाययोजनांच्या सादरीकरणातील त्रुटींबाबत ही बातमी आहे.

**सप्टेंबर -**

या महिन्याच्या अभ्यासलेल्या अंकांमध्ये दूधविषयक एकही बातमी प्रसिध्द झालेली नाही.

**ऑक्टोबर-**

या महिन्याच्या अभ्यासलेल्या अंकांमध्ये ११ तारखेच्या अंकामध्ये पान २ वर 'दूधउत्पादन वाढीसाठी द्विदल चारा' हा माहितीपर लेख आहे. २५ तारखेच्या पान ५ वर 'दूध दराच्या कपातीचा उत्पादकांना फटका' ही बातमी आहे. शासनाच्या निर्णयाचा फटका दूध उत्पादकांना बसतो आहे अशा आशयावर ही बातमी आहे.

**नोव्हेंबर-**

१ नोव्हेंबरच्या पहिल्या पानावर 'दूध दरात अखेर वाढ!' ही बातमी वृत्तपत्राचा मुख्य मथळा करण्यात आली आहे. यात शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन दूध दरवाढीचा निर्णय घेतला आहे. याच अंकात पान १४ वर 'आधुनिक गोठा कसा

बांधावा?' या वाचकांच्या विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिले आहे. नोव्हेंबरच्या ८ तारखेच्या अंकात पान ५ वर गोकुळ दूध संघाने घेतलेल्या जनावरांच्या दूध उत्पादनाच्या स्पर्धेविषयक बातमी प्रसिध्द झाली आहे.

**डिसेंबर -**

या महिन्याच्या ६ तारखेच्या पान ७ वर हितेश जानी या गुजरात मधील शास्त्रज्ञाने गायीचे दूध व मूत्र याविषयी केलेल्या संशोधन पर लेख प्रसिध्द झाला आहे.

# संदर्भसूची


१) माझंही एक स्वप्न होतं... कुरियन वर्गीस (आत्मचरित्र) — अनुवादः देशमुख सुजाता, डिसेंबर २००४, प्रकाशक- राजहंस प्रकाशन, पुणे

२) महाराष्ट्र दूध व्यवसाय अंतरंग — संपादक- बावगांवकर रमेश, डेअरी पब्लिकेशन्स, महाराष्ट्र.

३) Dairy science education & Training — Dr. Pandya A. J. HOD Anand Agriculture University,Anand, Gujrat.

४) Professional journalism — Kamat M. V. 1986, Vikas Publishing house, New Delhi. Page No.265

५) Dairy India 2007 Year Book — Dairy India Year Book